सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करणेबाबत.
श्रीम. वैशाली का. थोरात, सहायक संचालक.

**महाराष्ट्र शासन**
वित्त विभाग
शासन आदेश:- संलेको-२०२६/प्र.क्र.३३/कोषा प्रशा-२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, तिसरा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांक:-१७.०३.२०२६.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-२०.
18 MAR 2026
प्राप्त झाले सही......

संदर्भ:-

१. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२०/प्र.क्र.१००/कोषा.प्रशा-२, दिनांक १७.०८.२०२०.
२. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.२०१/कोषा.प्रशा-२, दि.०९.०२.२०२४.
३. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे आदेश क्र.SU/EST/363A, दिनांक २९.०२.२०२४.
४. श्रीम. वैशाली का. थोरात यांचे दिनांक ०१.०३.२०२४ रोजीचा अर्ज.
५. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे (राप)/प्रतिक्षाधीन/०३/२०२४/६५६, दिनांक ०१.०३.२०२४.
६. वित्त विभाग, शासन आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.३९/कोषा.प्रशा-२, दिनांक ०५.०३.२०२४.
७. सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांचे आदेश क्र.सहसंलेको/पुणे/आस्था-३/मविलेसे (राप)/कार्यमुक्त-श्रीम.वै.का.थोरात/०३/२०२४/७१९, दिनांक १२.०३.२०२४.
८. श्रीम. वैशाली का. थोरात यांचे दिनांक १२.०३.२०२४ रोजीचा अर्ज.
९. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र.संलेवको/प्रशा-राप/का-६/स.प्र.का/श्रीम.थोरात/१२.२५/९०/८१/३९४, दिनांक २१.०१.२०२६.

## शासन आदेश

140

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील श्रीम. वैशाली का. थोरात यांना संदर्भाधिन क्र.१ येथील वित्त विभाग, शासन आदेश दिनांक १७.०८.२०२० अन्वये मुख्य लेखापाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या पदावर पदस्थापना देण्यात आली. तद्नंतर, संदर्भाधिन क्र.२ येथील वित्त विभाग, शासन आदेश दिनांक ०९.०२.२०२४ अन्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील लेखा अधिकारी संवर्गातील श्रीम. दुर्गाली अभिजीत गायकवाड यांना सहायक संचालक संवर्गात पदोन्नती देण्यात येवून मुख्य लेखापाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या पदावर त्यांना पदस्थापना देण्यात आली व श्रीम. थोरात यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल, असे आदेशात नमूद करण्यात आले.

२) श्रीम. थोरात यांना मुख्य लेखापाल, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या पदावरुन कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे दिनांक २९.०२.२०२४ रोजीच्या आदेशानुसार दिनांक २९.०२.२०२४ (म.नं.) रोजीपासून कार्यमुक्त करण्यात आले.

३) श्रीम. थोरात यांनी कार्यमुक्त झाल्यानंतर त्यांच्या संदर्भाधिन दिनांक ०१.०३.२०२४ रोजीच्या अर्जान्वये सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे या कार्यालयात हजर करुन घेण्याबाबत विनंती केली. त्यानुसार, सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांच्या संदर्भाधिन दिनांक ०१.०३.२०२४ रोजीच्या

00352/2026/502
20.3.2026

आदेशानुसार, श्रीम. थोरात यांना दिनांक ०१.०३.२०२४ (म.पू.) रोजी हजर करुन घेण्यात आले व त्यांना जिल्हा कोषागार कार्यालय, सातारा येथे डाटा क्लिनिंगविषयक कामकाज करण्याबाबत सूचना देण्यात आल्या.

४) दरम्यान, संदर्भाधिन क्र. ६ येथील वित्त विभाग, शासन आदेश दिनांक ०५.०३.२०२४ अन्वये श्रीम. थोरात यांना सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सांगली या पदावर पदस्थापना देण्यात आली.

५) श्रीम. थोरात यांना सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, सांगली या पदावर हजर होण्यासाठी सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे यांच्या संदर्भाधिन दिनांक १२.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये त्यांना दिनांक १२.०३.२०२४ (म.नं.) रोजीपासून कार्यमुक्त करण्यात आले.

६) श्रीम. थोरात यांनी पदस्थापनेच्या प्रतिक्षाधिन कालावधीत जिल्हा कोषागार कार्यालय, सातारा येथील डाटा क्लिनिंगविषयक कामकाज हाताळले आहे.

७) पदस्थापनेच्या प्रतिक्षेत असताना श्रीम. थोरात यांनी कोणतीही रजा उपभोगलेली नाही.

८) श्रीम. थोरात यांना कार्यमुक्त केल्यानंतर म्हणजेच दिनांक ०१.०३.२०२४ पासून ते दिनांक १२.०३.२०२४ पर्यंत एकूण १२ दिवस पदस्थापनेशिवाय रहावे लागले आहे. सदर कालावधी कर्तव्य कालावधी म्हणून नियमित करावयाचा आहे. तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| कालावधी | दिवस | शेरा |
|---|---|---|
| दिनांक ०१.०३.२०२४ | ०१ | पदस्थापनेच्या प्रतिक्षेत सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे येथे कार्यरत. |
| दि.०२.०३.२०२४ ते दि.०३.०३.२०२४ | ०२ | शनिवार व रविवार ची शासकीय सुट्टी |
| दि.०४.०३.२०२४ ते दि.१२.०३.२०२४ | ०९ | जिल्हा कोषागार कार्यालय, सातारा कार्यालयात पदस्थापनेच्या प्रतिक्षेत कार्यरत. |
| **एकूण** | **१२** | |

९) यास्तव, वित्त विभाग, शासन परिपत्रक दिनांक २०.०२.२००८ मधील सूचना तसेच, म.ना.से.(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) १९८१ मधील नियम ९ (१४) (फ) व (जी) मधील तरतूदींच्या अधीन राहून महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक संवर्गातील श्रीम. वैशाली का. थोरात यांचा दिनांक ०१.०३.२०२४ ते दिनांक १२.०३.२०२४ रोजीपर्यंतच्या एकूण १२ दिवसांचा सक्तीचा प्रतिक्षाधिन कालावधी हा "कर्तव्य" कालावधी म्हणून नियमित करण्यास मंजूरी देण्यात येत आहे. तसेच, सदर प्रतिक्षाधिन कालावधीतील वेतन व भत्ते आहरित करण्याकरीता सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

अ.अ.भसारकर

**(अविनाश भसारकर)**
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत:-**

१) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२) महालेखापाल ½, (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर,*
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, नवी मुंबई,*

४) प्रधान सचिव (लेखा व कोषागारे) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
५) सहसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे विभाग, पुणे *
६) श्रीम. वैशाली का. थोरात, सहायक संचालक*
७) निवड नस्ती, कोषा प्रशा-२,
*(संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)